पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक २

-- सभावृत्तांत --

दिनांक : ०८/०५/२००९ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे मे २००९ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०८/०५/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या **अ** प्रभाग कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. दत्तात्रय बाबुराव साने -- अध्यक्ष
२. मा. रघुनंदन रामभाऊ घुले
३. मा. विजया अशोक जाधव
४. मा. एकनाथ दादा थोरात
५. मा. महेश गंगाराम चांदगुडे
६. मा. भिमा सखाराम बोबडे
७. मा. सुलभा रामभाऊ उबाळे
८. मा. शशिकिरण गवळी
९. मा. जावेद रमजान शेख

याशिवाय मा. श्री झुरे पी.एच., प्रभाग अधिकारी, मा.श्री बी.टी. बनकर, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा. श्री निकम एम.डी., कार्यकारी अभियंता (स्थापत्य मुख्यालय), मा.श्री चिंचवडे, कार्यकारी अभियंता (विद्युत) मा. श्री ए.जी. भोसले, प्रशासन अधिकारी, मा.श्री आव्हाळे, लेखाधिकारी, मा. श्री. नाईकरे, श्री शेळके, सहा. आरोग्य अधिकारी मा. श्री फुटाने, श्री.दिलीप कुदळे उपअभियंता (स्थापत्य), मा. श्री कांबळे व्ही.जी. उपअभियंता (पाणीपुरवठा), मा. श्री देशमुख उपअभियंता (विद्युत), मा.श्री.परदेशी उपअभियंता जलनि:सरण तसेच मा. श्री चौरे, (नगररचना विभाग), इत्यादी अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा. अध्यक्ष यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य व अधिकारी यांचे आभार मानून व स्वागत करून सभा सुरू करणेस अनुमती दिली.

मा. अध्यक्ष यांचे संमतीने खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

| | |
|---|---|
| विषय क्र. १ :- | वॉर्ड क्रमांक १ तळवडे गावठाण येथील म न पा शाळेची देखभाल व दुरुस्ती कामे करणे व जुन्या शाळेचे जागेस सिमाभिंत बांधणेकामी येणाऱ्या र. रु. ४,९५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणे बाबत विचार करणे. |
| विषय क्र. २ :- | मा.रघुनंदन घुले यांचा प्रस्ताव<br>वॉर्ड क्रमांक २ प्रबोधनकार ठाकरे विद्यालय, श्रमीकनगर या इमारतीस रंगरंगोटी करणेबाबत. |
| विषय क्र. ३ :- | मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव<br>वॉर्ड क्रमांक ३ त्रिवेणीनगर येथे भूमिगत गटर करणेबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : ०८/०५/२००९ | विभाग | : विद्युत विभाग |
| सुचक | : मा. शशिकिरण गवळी | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. अप्र /वि/१२७/०९ दिनांक ०५/०५/२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

अ प्रभागांतर्गत जनित्रसंचाची वार्षीक देखभाल दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या र.रु. ४,५०,०००/- (चार लाख पन्नास हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ६ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : ०८/०५/२००९ | विभाग | : विद्युत विभाग |
| सुचक | : मा. महेश चांदगुडे | अनुमोदक | : मा. एकनाथ थोरात |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. अप्र /वि/१२८/०९ दिनांक ०५/०५/२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

निगडी गावठाण विभागांतर्गत वॉर्ड क्रमांक ४४,४८,४ मधील दिवाबत्ती व्यवस्थेची वार्षीक देखभाल दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या र.रु. ४,९९,९००/- (चार लाख नव्याण्णव हजार नऊशे फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ७ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : ०८/०५/२००९ | विभाग | : स्थापत्य विभाग |
| सुचक | : मा. सुलभा उबाळे | अनुमोदक | : भिमा बोबडे |

संदर्भ : मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. अप्र /स्थापत्य/४०८/०९ दिनांक ०६/०५/२००९

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

वॉर्ड क्रमांक १ तळवडे गावठाण येथील म.न.पा. शाळेची देखभाल दुरुस्तीची कामे करणे व जुन्या शाळेचे जागेस सिमाभिंत बांधणेकामी येणाऱ्या र.रु. ४,९५,०००/- (चार लाख पंच्याण्णव हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ८ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : ०८/०५/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. रघुनंदन घुले | अनुमोदक | : सुलभा उबाळे |

संदर्भ : मा.रघुनंदन घुले यांचा प्रस्ताव

वॉर्ड क्रमांक २ प्रबोधनकार ठाकरे विद्यालय, श्रमीकनगर या इमारतीस रंगरंगोटी करणेकामी येणाऱ्या र.रु. ४,९०,०००/- (चार लाख नव्वद हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ९ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : ०८/०५/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. विजया जाधव | अनुमोदक | : मा. रघुनंदन घुले |

संदर्भ : मा. विजया जाधव यांचा प्रस्ताव

वॉर्ड क्रमांक ३ त्रिवेणीनगर येथील नुतन प्रशाला त्रिवेणीनगर ते खुश्बु नर्सरी त्रिवेणीनगर तळवडे रोड पर्यंत भूमिगत गटर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-xxx
(दत्तात्रय बाबुराव साने)
अध्यक्ष
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती
क्र. अप्र/प्रशा/२/कावि/ ११७ /०९
दिनांक :- २५ / ०५ /२००९

सही/-xxx
प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी पुणे-४४

प्रत :- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना